पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 26/09/2019 (गुरूवार)
(सायंकाळ)

अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे.काटोल :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर बस स्टॅन्ड परीसर, काटोल येथे दिनांक 25/09/19 चे 00/35 वा. ते 01/10 वा. दरम्यान आरोपी नामे – विक्की पुडलिक कातलाम, वय 23 वर्ष, रा. वाघोडा, ता. काटोल हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात चाकु घेवुन बसस्टॅड काटोल परिसरात फिरत असतांना मिळून आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि आशिष बाळकृष्ण हिरूळकर पोस्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे . काटोल येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा 135 मुपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास परि पोउपनि संतोष निभोरकर हे करीत आहे.

सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावर मौजा इटगाव शिवार येथे दिनांक 05/09/2019 चे 11.00 वा. दरम्यान गवतामध्ये असलेले सायडुल नावाचे सापाने फुंकारा घेतल्याने सापाचे विष राष्ट्रपाल रामाजी बेलेकर, वय 52 वर्ष, रा. ईटगाव यांच्या डाव्या पायाचे पोटरीवर पडल्याने तीथे जखम झाली. ती जखम फुटल्याने राष्ट्रपाल बेलेकर यांना प्रथम ग्रामीण रूग्णालय पारशिवनी येथे भरती केले व नंतर दि. 13/09/19 चे 13:45 वा. मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता त्यांचे उपचार दरम्यान दि. 22/09/19 चे 05:00 वा. मृत्यू झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा मनोहर दुबे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर तर्फे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार शैलेश रामटेके हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर